शासकीय सेवकांना पदोन्नतीसंदर्भात मानीव दिनांक देण्याबाबत.

प्रकरण तपासणी अधिकाराबाबत.

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांकः एसआरव्ही 1093/प्र.क्र 2/93/बारा,
मंत्रालय, मुंबई–400 032, दिनांक 7 जून, 1996.

वाचा :– (1) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांकः एसआरव्ही–1093/प्र.क्र.2/93/12, दिनांक 11 जून, 1993.

(2) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांकः एसआरव्ही–1093:प्र.क्र.2/93/12, दिनांक 13 डिसेंबर, 1993.

## शासन परिपत्रक

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांकः एसआरव्ही–1093/प्र.क्र.2/93/12, दिनांक 11 जून,1993 अनुसार शासकीय कर्मचा–यांना मानीव दिनांक देण्याच्या प्रकरणी सामान्य प्रशासन व वित्त विभागाची सहमती घेणे आवश्यक आहे.

2. सदर आदेशापूर्वी निकाली काढण्यात आलेली प्रकरणे मंत्रालयीन प्रशासकीय विभागांकडून सामान्य प्रशासन व वित्त विभागाकडे सहमतीसाठी पाठविण्यात येत आहेत. त्यामुळे शासन याद्वारे असे निदेश देत आहे की, दिनांक 11 जून, 1993 च्या पूर्वी निकाली काढण्यात आलेल्या सर्व प्रकरणी पुनर्विलोकन करणे अपेक्षित नाही. परिणामी अशी सर्व प्रकरणे सामान्य प्रशासन व वित्त विभागाकडे सहमतीसाठी पाठविणे आवश्यक नाही. तथापि, ज्या प्रकरणांमध्ये मानीव दिनांक देताना अनियमितता घडल्याचे वेतन पडताळणी वा अन्य एखाद्या सक्षम प्राधिका–याच्या निदर्शनास आले आहे, अशी प्रकरणे मात्र सामान्य प्रशासन व वित्त विभागास मान्यतेसाठी पाठविणे आवश्यक आहे.

प्रस्तुत आदेश वित्त विभागाची संमती अनौपचारिक संदर्भ क्रमांक 353/सेवा–3, दिनांक 2 एप्रिल, 1996 अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सु. र. सुर्वे,
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

1. राज्यपाल यांचे सचिव,
2. मुख्य मंत्री यांचे सचिव,
* 3. प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा/अपिल शाखा, मुंबई,
* 4. प्रबंधक, लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* 5. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
6. महालेखापाल, महाराष्ट्र–1, मुंबई,
7. महालेखापाल, महाराष्ट्र–2, नागपूर,
8. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
9. विविध मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व सर्व कार्यालय प्रमुख,
10. सर्व मंत्रालयीन विभाग,
11. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने.

----------

* पत्राने.